भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# कारागृहे अधिनियम, १८९४

**(सन १८९४ चा अधिनियम क्रमांक ९)**

[दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी यथाविद्यमान]

# The Prisons Act, 1894

**(Act No. 9 of 1894)**

[*As in force on the 10th November, 2009*]

*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२०१४

[ किंमत : रुपये १५-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रिझन्स अॅक्ट १८९४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा,** अनुभाग १, खंड १६, अंक १, दिनांक २८ जुलै, २०११ यात पृष्ठे ९ ते २२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २८ जुलै, २०११.

**व्ही. के. भसीन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Prisons Act, 1894 as on the 10th November, 2009 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazettee of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol.16, dated 28th July, 2011 on pages 9 to 22.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 28th July, 2011.

V. K. BHASIN,
Secretary to the
Government of India.

# कारागृहे अधिनियम, १८९४

## कलमांचा क्रम

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**कलमे**


१. नाव, विस्तार व प्रारंभ

२. [ निरसित ].

३. व्याख्या.


प्रकरण दोन

**कारागृहांची देखभाल व त्यांचे अधिकारी**


४. कैद्यांची सोय.

५. महानिरीक्षक.

६. कारागृहांचे अधिकारी.

७. कैद्यांसाठी तात्पुरती सोय.


प्रकरण तीन

**अधिकाऱ्यांची कर्तव्ये**

**सर्वसाधारणतः**


८. कारागृहांतील अधिकाऱ्यांचे नियंत्रण व त्यांची कर्तव्ये.

९. अधिकाऱ्यांचे कैद्यांशी धंद्याच्या स्वरूपाचे व्यवहार नसावेत.

१०. अधिकाऱ्यांचे कारागृह कंत्राटांमध्ये हितसंबंध नसणे.


**अधीक्षक**


११. अधीक्षक.

१२. अधीक्षकाने ठेवावयाचे अभिलेख.


**वैद्यकीय अधिकारी**


१३. वैद्यकीय अधिकाऱ्याची कर्तव्ये.

१४. विवक्षित प्रकरणांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याने द्यावयाचा अहवाल.

१५. कैद्याच्या मृत्यूबाबत अहवाल.


**तुरुंगाधिकारी**


१६. तुरुंगाधिकारी.

१७. तुरुंगाधिकाऱ्याने कैद्याचा मृत्यू झाल्याचे कळवणे.

१८. तुरुंगाधिकाऱ्याची जबाबदारी.

१९. तुरुंगाधिकाऱ्याने रात्री उपस्थित राहावयाचे.

२०. उप तुरुंगाधिकारी आणि सहायक तुरुंगाधिकारी यांचे अधिकार.

कलमे

**दुय्यम अधिकारी**

२१. दरवानाची कर्तव्ये.

२२. दुय्यम अधिकाऱ्याने परवानगीशिवाय अनुपस्थित राहावयाचे नाही.

२३. दोष सिद्ध झालेले अधिकारी.

प्रकरण चार

**कैद्यांना दाखल करून घेणे, हलवणे व मुक्त करणे**

२४. दाखल केल्यानंतर कैद्यांची तपासणी करणे.

२५. कैद्यांच्या चीजवस्तू.

२६. कैद्यांना हलवणे व मुक्त करणे.

प्रकरण पाच

**कैद्यांना शिस्त लावणे**

२७. कैद्यांना अलग अलग ठेवणे.

२८. कैद्यांना एकत्र ठेवणे आणि अलग अलग ठेवणे.

२९. एकांत बंदीवास.

३०. मृत्युदंडाचे कैदी.

प्रकरण सहा

**दिवाणी कैद्यांचे व दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्यांचे अन्न, कपडे व अंथरूण-पांघरूण**

३१. विवक्षित कैद्यांचा खाजगीरीत्या निर्वाह.

३२. विवक्षित कैद्यांमध्ये आपापसात अन्न व कपडे बदली करण्यावरील निर्बंध.

३३. दिवाणी कैद्यांना आणि दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्यांना कपडे व अंथरूण-पांघरून पुरवणे

प्रकरण सात

**कैद्यांचे सेवायोजन**

३४. दिवाणी कैद्यांचे सेवायोजन.

३५. फौजदारी कैद्यांचे सेवायोजन.

३६. साध्या कारावासाची शिक्षा झालेल्या फौजदारी कैद्यांचे सेवायोजन.

प्रकरण आठ

**कैद्यांचे स्वास्थ्य**

३७. आजारी कैदी.

३८. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निदेशांची नोंद.

३९. रुग्णालय.

प्रकरण नऊ

**कैद्यांच्या भेटी घेणे**

४०. दिवाणी कैद्यांच्या आणि दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्यांच्या भेटी घेणे.

४१. भेटीला येणाऱ्या व्यक्तींची झडती.

**कलमे**

प्रकरण दहा

**कारागृहांच्या संबंधातील अपराध**

४२. प्रतिषिद्ध वस्तू कारागृहात आणणे किंवा कारागृहातून नेणे व कैद्यांशी संपर्क साधणे याबद्दल शास्ती.

४३. कलम ४२ खालील अपराधाबद्दल अटक करण्याचा अधिकार.

४४. शास्ती जाहीर करणे.

प्रकरण अकरा

**कारागृह-अपराध**

४५. कारागृह-अपराध.

४६. अशा अपराधांबद्दल शिक्षा.

४७. कलम ४६ खाली शिक्षेचे बहुत्व.

४८. कलम ४६ व ४७ खालील शिक्षा.

४९. शिक्षा पूर्ववर्ती कलमांना अनुसरून असणे.

५०. कैदी शिक्षेसाठी पात्र ठरत असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित करणे.

५१. शिक्षा पुस्तकातील नोंदी.

५२. घृणास्पद अपराध घडून आला असता अनुसरावयाची कार्यपद्धती.

५३. फटके मारणे.

५४. कारागृहाच्या दुय्यम कर्मचाऱ्यांनी केलेले अपराध.

प्रकरण बारा

**संकीर्ण**

५५. कैद्यांची बहि:शाल अभिरक्षा, नियंत्रण व रोजगार.

५६. बेड्या घालून बंदिस्त करणे.

५७. काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांना बेड्या घालून बंदिस्त करणे.

५८. आवश्यक असल्याखेरीज तुरूंगाधिकाऱ्यांनी कैद्यांना बेड्या अडकवू नयेत.

५९. नियम करण्याचा अधिकार.

६०. [ निरसित ]

६१. नियमांच्या प्रती प्रदर्शित करणे.

६२. अधीक्षक आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारांचा वापर करणे.

**अनुसूची :** [ निरसित ].

# कारागृहे अधिनियम, १८९४[१]

**[१][ (१८९४ चा अधिनियम क्रमांक ९)]**

( १० नोव्हेंबर २००९ रोजी यथाविद्यमान)

[ २२ मार्च १८९४]

**कारागृहांसंबंधीचा कायदा सुधारित करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** [१][१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग ख, राज्यांमध्ये समाविष्ट होती ती खेरीजकरून भारतातील] कारागृहांशी संबंधित असलेला कायदा सुधारित करणे आणि अशा कारागृहांच्या विनियमनासाठी नियमांची तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

**नाव, विस्तार व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमाला, " कारागृहे अधिनियम, १८९४ " असे म्हणावे.

[२][(२) [३][१ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग ख राज्यांमध्ये समाविष्ट होती ती] खेरीजकरून संपूर्ण भारतात लागू असेल] आणि

(३) तो, १ जुलै, १८९४ पासून अंमलात येईल.

(४) मुंबई, [४][राज्यातील] परंतु, मुंबई शहराबाहेरील [५][१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी स्थापन झाले आहेत म्हणून] दिवाणी तुरुंगांना या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही, आणि ते तुरुंग १८७४ चा मुंबई अधिनियम २ [६]हा त्यानंतरच्या कायद्यानी जसा सुधारण्यात आला तशा त्या अधिनियमाच्या कलम ९ आणि १६ (दोन्ही धरून) यातील तरतुदींन्वये तसेच पुढे प्रशासिले जातील.

**२.** [निरसित.] :–निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १) कलम २ व अनुसूचीद्वारे निरसित.

**व्याख्या.**

**३.** या अधिनियमामध्ये.—

(१) " कारागृह " याचा अर्थ, कैद्यांना स्थानबद्ध करण्यासाठी राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांनुसार नेहमीकरता किंवा तात्पुरता वापरला जाणारा तुरुंग किंवा जागा, असा आहे आणि तदंगभूत असलेल्या सर्व जमिनी व इमारती यांचा त्यात समावेश आहे, पण—

(क) सर्वस्वी पोलिसांच्या अभिरक्षेत असलेल्या कैद्यांना बंदिवासात ठेवण्याची कोणतीही जागा ;

(ख) [७] फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२ ( १८८२ चा १० ) याच्या कलम ५४१ अन्वये राज्य शासनाने विशेषकरून नेमून दिलेली कोणतीही जागा ; किंवा

(ग) राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे दुय्यम तुरुंग म्हणून जाहीर केलेली कोणतीही जागा ;

यांचा त्यात समावेश नाही ;

(२) " फौजदारी कैदी " याचा अर्थ, फौजदारी अधिकारितेचा वापर करणाऱ्या कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने रिट अन्वये, अधिपत्रान्वये किंवा आदेशान्वये अथवा लष्करी न्यायालयाच्या आदेशानुसार रीतसर अभिरक्षेत पाठवलेला कैदी, असा आहे ;

---

१. विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ द्वारे भाग क राज्यांतील व भाग ग राज्यांतील, या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम बदली दाखल करण्यात आले.

३. विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ द्वारे " भाग ख राज्ये " या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

४. विधि अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे " इलाखा " या शब्दासाठी " प्रांत " हा शब्द बदली दाखल करण्यात आला होता तो विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " प्रांत " या शब्दासाठी राज्य हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

५. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. दिवाणी तुरुंग अधिनियम, १८७४.

७. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) या संदर्भाधीन.

(३) " दोषसिद्ध झालेला फौजदारी कैदी " याचा अर्थ, एखाद्या न्यायालयाच्या किंवा लष्करी न्यायालयाच्या शिक्षादेशास अधीन असलेला कोणताही फौजदारी कैदी, असा आहे आणि यात, [१] फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२ ( १८८२ चा १०) — प्रकरण आठच्या तरतुदींनुसार किंवा [२] कैदी अधिनियम, १८७१ (१८७१ चा ५) यानुसार कारागृहात स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीचा समावेश आहे.

(४) " दिवाणी कैदी " याचा अर्थ, फौजदारी कैदी नसणारा कोणताही कैदी, असा आहे ;

(५) " सूट देण्याची पद्धत " याचा अर्थ, तुरुंगातील कैद्यांना गुण देऊन आणि त्यानुसार त्यांच्या शिक्षा कमी करण्याबाबत विनियमन करणारे त्या त्या काळी अंमलात असलेले नियम, असा आहे ;

(६) " वृत्तक " याचा अर्थ, या अधिनियमानुसार किंवा त्याखालील नियमांनुसार प्रत्येक कैद्याच्या बाबतीत आवश्यक असेल अशी माहिती दर्शविणारी पत्रिका, असा आहे ;

(७) " महानिरीक्षक " याचा अर्थ, कारागृह महानिरीक्षक, असा आहे ;

(८) " दुय्यम वैद्यकीय कर्मचारी " याचा अर्थ, सहायक शल्यचिकित्सक, औषधविक्रेता किंवा अर्हताप्राप्त रुग्णालय सहायक, असा आहे ; आणि

(९) " प्रतिषिद्ध वस्तू " याचा अर्थ, जी वस्तू या अधिनियमाखालील कोणत्याही नियमानुसार कारागृहात आणणे किंवा कारागृहातून बाहेर नेणे प्रतिषिद्ध आहे ती वस्तू, असा आहे.

## प्रकरण दोन

### कारागृहांची देखभाल व त्यांचे अधिकारी

**कैद्यांची सोय.**

**४.** राज्य शासन, अशा शासनाच्या अधीन असलेल्या राज्यक्षेत्रांमधील कैद्यासाठी, कैद्यांना वेगळे वेगळे ठेवण्यासंबंधी या अधिनियमाने आवश्यक केलेल्या गोष्टींचे अनुपालन होईल अशा रीतीने बांधलेल्या व विनियमित होत असलेल्या कारागृहांमध्ये सोय करील.

**महानिरीक्षक.**

**५.** प्रत्येक राज्य शासनाच्या अधीन असलेल्या राज्यक्षेत्रांसाठी एकेका महानिरीक्षकाची नियुक्ती केली जाईल, आणि राज्य शासनाच्या आदेशांच्या अधीनतेने, तो अशा शासनाच्या अधीन असलेल्या राज्यक्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या सर्व कारागृहांवर सर्वसाधारण नियंत्रण ठेवील व त्यांच्यावर देखरेख करील.

**कारागृहांचे अधिकारी.**

**६.** प्रत्येक कारागृहांसाठी एक अधीक्षक, एक वैद्यकीय अधिकारी ( तो अधीक्षकही असू शकेल), एक दुय्यम वैद्यकीय कर्मचारी, एक तुरुंगाधिकारी आणि राज्य शासनाला आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी असतील :

परंतु, [३] [ मुंबई राज्य शासन ] [४] ****** लेखी आदेशाद्वारे असे जाहीर करू शकेल की, आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारागृहामध्ये, अधीक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती तुरुंगाधिकाऱ्याचे कार्यपद धारण करील.

**कैद्यांसाठी तात्पुरती सोय.**

**७.** एखाद्या कारागृहात जितक्या कैद्यांना सोयीस्करपणे किंवा सुरक्षितपणे ठेवता येईल त्याहून तेथील कैद्यांची संख्या जास्त आहे आणि हे जादा कैदी दुसऱ्या कारागृहात पाठविणे सोयीचे नाही असे जेव्हा महानिरीक्षकाला दिसून येईल तेव्हा,

अथवा जेव्हा एखाद्या कारागृहामध्ये साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे, कोणत्याही कैद्यांना तात्पुरता आश्रय देऊन अभिरक्षेत सुरक्षित ठेवणे इष्ट असेल तेव्हा,

राज्य शासन निदेश देईल अशा अधिकाऱ्याकडून आणि अशा रीतीने त्या कारागृहात त्यांना सोयीस्करपणे किंवा सुरक्षितपणे ठेवता येणार नाहीत अशा कैद्यांना तात्पुरत्या कारागृहांमध्ये, आश्रय देण्यासाठी आणि त्यांना अभिरक्षेत सुरक्षित ठेवण्यासाठी व्यवस्था करण्यात येईल.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम बदली दाखल करण्यात आले.

२. आता पहा : कैदी अधिनियम, १९०० ( १९०० चा ३).

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आले.

४. वरील आदेशानुसार हा मजकूर वगळण्यात आला.

# प्रकरण तीन

## अधिकाऱ्यांची कर्तव्ये

### सर्वसाधारणतः

**८.** कारागृहाचे सर्व अधिकारी, अधीक्षकाच्या निदेशांचे पालन करतील; तुरुंगाधिकाऱ्याला दुय्यम असलेले सर्व अधिकारी, तुरुंगाधिकाऱ्याने अधीक्षकाच्या मंजुरीने त्यांना नेमून दिली असतील किंवा कलम [१] [५९] खालील नियमांनुसार विहित केलेली असतील ती कर्तव्ये पार पाडतील. **कारागृहांतील अधिकाऱ्यांचे नियंत्रण व त्यांची कर्तव्ये.**

**९.** कारागृहातील कोणताही अधिकारी किंवा त्याच्यातर्फे विश्वस्ताची भूमिका धारण करणारी किंवा त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, कोणत्याही कैद्याला एखादी वस्तू विकत किंवा भाड्याने देणार नाही अथवा अशी वस्तू विकून किंवा भाड्याने देऊन त्यापासून फायदा मिळवणार नाही किंवा कोणत्याही कैद्याशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही आर्थिक किंवा धंद्याच्या स्वरूपाचा इतर व्यवहार करणार नाही. **अधिकाऱ्यांचे कैद्यांशी धंद्याच्या स्वरूपाचे व्यवहार नसावेत.**

**१०.** कारागृहातील कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा त्याच्यातर्फे विश्वस्ताची भूमिका धारण करणाऱ्या किंवा त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीचे, कारागृहाच्या पुरवठा संविदेत कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असणार नाही ; तसेच, कारागृहाच्या वतीने किंवा कैद्याच्या मालकीची एखादी वस्तू विकून किंवा खरेदी करून तो कोणताही फायदा मिळवणार नाही. **अधिकाऱ्यांचे कारागृह कंत्राटांमध्ये हितसंबंध नसणे.**

### अधीक्षक

**११.** (१) महानिरीक्षकाच्या आदेशांच्या अधीनतेने, अधीक्षक हा अनुशासन, मजुरी, खर्च, शिक्षा व नियंत्रण यासंबंधीच्या सर्व बाबतीत कारागृहाची व्यवस्था पाहील. **अधीक्षक.**

(२) राज्य शासन देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीनतेने, मध्यवर्ती कारागृहाहून किंवा इलाखा शहरात स्थित असलेल्या कारागृहाहून अन्य कारागृहाचा अधीक्षक, कारागृहासंबंधी जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून या अधिनियमाशी किंवा त्याखालील कोणत्याही नियमाशी विसंगत नसलेले जे जे आदेश देण्यात आलेले असतील ते ते सर्व आदेश पाळील व असे सर्व आदेश आणि त्यांवर केलेली कारवाई महानिरीक्षकाला कळवील.

**१२.** अधीक्षक पुढील अभिलेख ठेवील किंवा ठेवण्याची व्यवस्था करील :— **अधीक्षकाने ठेवावयाचे अभिलेख.**

(१) दाखल केलेल्या कैद्यांची नोंदवही ;

(२) प्रत्येक कैद्याला केव्हा मुक्त करावयाचे ते दर्शविणारे पुस्तक ;

(३) कारागृहविषयक अपराधांबद्दल कैद्यांना ठोठवण्यात येणाऱ्या शिक्षांची नोंद घेण्यासाठी शिक्षा पुस्तक ;

(४) कारागृहाच्या प्रशासनाशी संबंधित अशा कोणत्याही गोष्टींबाबत अभ्यागतांनी दिलेल्या कोणत्याही अभिप्रायांची नोंद करण्यासाठी अभ्यागत पुस्तक ;

(५) कैद्यांकडून घेतलेले पैसे व इतर वस्तू यांचा अभिलेख,

आणि कलम ५९ [२][ * * * ] खालील नियमांद्वारे विहित केले असेल त्याप्रमाणे असे इतर सर्व अभिलेख.

### वैद्यकीय अधिकारी

**१३.** अधीक्षकाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, वैद्यकीय अधिकाऱ्याकडे कारागृहाच्या आरोग्यविषयक प्रशासनाचा प्रभार असेल आणि तो कलम [१][५९] खाली राज्य शासनाने केलेल्या नियमांमध्ये विहित केली असतील त्याप्रमाणे अशी कर्तव्ये पार पाडील. **वैद्यकीय अधिकाऱ्याची कर्तव्ये.**

**१४.** एखाद्या कैद्याच्या मनावर, ज्या प्रकारचे अनुशासन किंवा वागवणूक त्याला मिळते, त्यामुळे बाधक परिणाम झाला आहे किंवा होण्यासारखा आहे असे समजण्यास वैद्यकीय अधिकाऱ्याला कारण असेल तेव्हा, तो वैद्यकीय अधिकारी, ती बाब त्याला योग्य वाटेल अशा अभिप्रायांसह अधीक्षकाला लेखी कळवील. **विवक्षित प्रकरणांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याने द्यावयाचा अहवाल.**

हा अहवाल, अधीक्षकाच्या त्यावरील आदेशांसह ताबडतोब महानिरीक्षकाकडे माहितीसाठी पाठवण्यात येईल.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " किंवा कलम ६० " हे शब्द व आकडा गाळण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " ६० " याऐवजी बदली दाखल करण्यात आले.

कैद्याचा मृत्यूबाबत अहवाल.

**१५.** एखाद्या कैद्याचा मृत्यू झाल्यास, वैद्यकीय अधिकारी पुढील तपशील त्याला करता येईल तेवढे निश्चित करून नोंदवहीमध्ये ताबडतोब नमूद करील, तो असा :—

(१) मृत कैद्याने आजारपणाबाबत प्रथम तक्रार केली किंवा तो आजारी असल्याचे आढळला तो दिवस,

(२) तो त्या दिवशी काही मजुरीचे काम करीत असल्यास ते काम,

(३) त्या दिवशीचे त्याचे आहारमान,

(४) त्याला ज्या दिवशी रुग्णालयात दाखल केले तो दिवस,

(५) त्याच्या आजाराबद्दल वैद्यकीय अधिकाऱ्याला ज्या दिवशी प्रथम कळवण्यात आले तो दिवस,

(६) रोगाचे स्वरूप,

(७) मृत व्यक्तीला मृत्यूपूर्वी वैद्यकीय अधिकाऱ्याने किंवा दुय्यम वैद्यकीय कर्मचाऱ्याने शेवटचे तपासले होते तो दिवस,

(८) कैदी केव्हा मृत्यू पावला ते, आणि

(९) (मरणोत्तर तपासणी झालेली आहे अशा प्रकरणांमध्ये) मृत्यूनंतर शवाची जी अवस्था दिसली तिचा वृत्तांत,

तसेच सोबत वैद्यकीय अधिकाऱ्याला आवश्यक वाटतील असे इतर विशेष अभिप्राय.

## तुरुंगाधिकारी

तुरुंगाधिकारी.

**१६.** (१) अधीक्षकाने अन्यत्र राहण्यास लेखी परवानगी दिली नसेल तर, तुरुंगाधिकारी कारागृहातच राहील.

(२) महानिरीक्षकाच्या लेखी मंजुरीशिवाय, तुरुंगाधिकारी दुसऱ्या कोणत्याही नोकरीशी संबंध ठेवणार नाही.

तुरुंगाधिकाऱ्याने कैद्याचा मृत्यू झाल्याचे कळवणे.

**१७.** कैद्याचा मृत्यू होताच तुरुंगाधिकारी, अधीक्षकाला आणि दुय्यम वैद्यकीय कर्मचाऱ्याला तत्काळ तसे कळवील.

तुरुंगाधिकाऱ्याची जबाबदारी.

**१८.** हवालतनामे व तुरुंगाधिकाऱ्याच्या हवाली करण्यात आलेले इतर सर्व दस्तऐवज आणि कैद्यांकडून घेतलेले पैसे व इतर वस्तू यांकरता कलम १२ अनुसार ठेवावयाच्या अभिलेखांच्या सुरक्षित ताब्यासाठी तुरुंगाधिकारी जबाबदार राहील.

तुरुंगाधिकाऱ्याने रात्री उपस्थित राहावयाचे.

**१९.** अधीक्षकाच्या लेखी परवानगीशिवाय तुरुंगाधिकारी कारागृहात रात्री अनुपस्थित राहणार नाही: परंतु अपरिहार्य कारणामुळे तो रात्री परवानगीशिवाय अनुपस्थित राहिला तर, तो ताबडतोब ती वस्तुस्थिती व त्याबाबतचे कारण अधीक्षकाला कळवील.

उप तुरुंगाधिकारी आणि सहायक तुरुंगाधिकारी यांचे अधिकार.

**२०.** जेव्हा उप तुरुंगाधिकारी किंवा सहायक तुरुंगाधिकारी यांची एखाद्या कारागृहात नियुक्ती केली जाते तेव्हा, तो अधीक्षकाच्या आदेशांस अधीन राहून, हा अधिनियम किंवा त्या खालील कोणताही नियम यानुसार तुरुंगाधिकाऱ्याची जी कर्तव्ये असतील त्यांपैकी कोणतेही कर्तव्य पार पाडण्यास सक्षम असेल व त्यानुसार तुरुंगाधिकाऱ्यावर ज्या जबाबदाऱ्या असतील त्या सर्व जबाबदाऱ्यांना तो अधीन राहील.

## दुय्यम अधिकारी

दरवानाची कर्तव्ये.

**२१.** दरवान म्हणून काम करणारा अधिकारी किंवा कारागृहाचा अन्य कोणताही अधिकारी, कारागृहात आणली जाणारी किंवा कारागृहातून बाहेर नेली जाणारी कोणतीही वस्तू तपासू शकेल आणि जी व्यक्ती एखादी प्रतिषिद्ध वस्तू कारागृहात आणत आहे किंवा कारागृहातून बाहेर नेत आहे किंवा कारागृहाची मालमत्ता कारागृहाबाहेर नेत आहे असा संशय असेल त्या व्यक्तीला थांबवून तिची झडती घेऊ शकेल किंवा झडती घेण्याची व्यवस्था करू शकेल आणि अशी कोणतीही वस्तू किंवा मालमत्ता आढळल्यास तो तत्काळ तुरुंगाधिकाऱ्याला त्याची सूचना देईल.

दुय्यम अधिकाऱ्याने परवानगीशिवाय अनुपस्थित राहावयाचे नाही.

**२२.** तुरुंगाधिकाऱ्याला दुय्यम असणारे अधिकारी, अधीक्षकाची किंवा तुरुंगाधिकाऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय कारागृहात अनुपस्थित राहाणार नाहीत.

१८६० चा ४५. **२३.** कारागृहांचे अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या कैद्यांना भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५ ) यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक मानण्यात येईल. **दोष सिद्ध झालेला अधिकारी.**

## प्रकरण चार

### कैद्यांना दाखल करून घेणे, हलवणे व मुक्त करणे

**२४.** (१) जेव्हा एखाद्या कैद्याला कारागृहात दाखल केले जाईल तेव्हा, त्याची झडती घेतली जाईल व त्याच्याकडील सर्व हत्यारे व प्रतिषिद्ध वस्तू काढून घेतल्या जातील. **दाखल केल्यानंतर कैद्यांची तपासणी करणे.**

(२) प्रत्येक फौजदारी कैद्याचीही, त्याला दाखल केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांनुसार तपासणी केली जाईल व तो वैद्यकीय अधिकारी, तुरुंगाधिकाऱ्याने ठेवावयाच्या पुस्तकात कैद्याचे प्रकृतिमान, आणि त्याच्या शरीरावरील कोणत्याही जखमा किंवा खुणा, त्याला सश्रम कारावासाची शिक्षा दिली असल्यास कोणत्या प्रकारची मजुरी करण्यास तो लायक आहे ते, आणि वैद्यकीय अधिकाऱ्याला जे काही अधिक अभिप्राय नमूद करणे आवश्यक वाटतील त्या अभिप्रायांची नोंद करील किंवा करवील.

(३) स्त्री-कैद्यांच्या बाबतीत झडतीचे आणि तपासणीचे काम, वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांनुसार अधिसेविकेकरवी करण्यात येईल.

**२५.** ज्याबाबत सक्षम न्यायालयाने कोणताही आदेश दिलेला नसेल आणि एखाद्या फौजदारी कैद्याकडून योग्य प्राधिकारांन्वये कारागृहात आणली जाऊ शकतात किंवा त्या कैद्याच्या वापरासाठी कारागृहाकडे पाठविले जाऊ शकतात असे सर्व पैसे किंवा इतर वस्तू तुरुंगाधिकाऱ्याच्या ताब्यात ठेवण्यात येतील. **कैद्यांच्या चीजवस्तू.**

**२६.** (१) दुसऱ्या कोणत्याही कारागृहात हलवण्यापूर्वी सर्व कैद्यांची वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करण्यात येईल. **कैद्यांना हलविणे व मुक्त करणे.**

(२) ज्यामुळे कैद्याला एका कारागृहातून दुसऱ्या कारागृहात हलवणे अयोग्य ठरेल अशा स्वरूपाचा त्याला कोणताही आजार नाही असे वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याशिवाय त्या कैद्याला एका कारागृहातून दुसऱ्या कारागृहात हलवण्यात येणार नाही.

(३) कैद्याला अतिशय तीव्र किंवा भयानक चित्तक्षोभाचा विकार असल्यास त्याच्या इच्छेविरुध्द किंवा त्याला मुक्त करणे सुरक्षित आहे असे वैद्यकीय अधिकाऱ्याला वाटत नाही तोपर्यंत त्याला मुक्त केले जाणार नाही.

## प्रकरण पाच

### कैद्यांना शिस्त लावणे

**२७.** कैद्यांना अलग अलग ठेवण्याबाबत या अधिनियमाद्वारे आवश्यक केलेल्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत :— **कैद्यांना अलग अलग ठेवणे.**

(१) ज्या कारागृहांमध्ये स्त्री-कैदी तसेच पुरुष-कैदी असतील तेथे, स्त्री-कैदी पुरुष-कैद्यांना पाहू शकणार नाहीत किंवा त्यांच्याशी वार्तालाप करू शकणार नाहीत किंवा कोणताही व्यवहार करू शकणार नाहीत अशा रीतीने स्त्री-कैद्यांना स्वतंत्र इमारतीमध्ये किंवा त्याच इमारतीतील स्वतंत्र भागांमध्ये बंदिस्त करण्यात येईल ;

(२) ज्या कारागृहांमध्ये [१][ एकवीस वर्षे ] वयाखालील पुरुष-कैद्यांना बंदिवासात ठेवण्यात आलेले असेल तेथे, इतर कैद्यांपासून त्यांना संपूर्णपणे अलग करण्यासाठी आणि त्यांच्यापैकी वयात न आलेल्या कैद्यांपासून अलग करण्यासाठी आवश्यक ती साधने पुरविण्यात येतील ;

(३) दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्यांना दोष सिद्ध झालेल्या फौजदारी कैद्यांपासून अलग ठेवण्यात येईल ;

(४) दिवाणी कैद्यांना फौजदारी कैद्यांपासून अलग ठेवण्यात येईल.

**२८.** लगतपूर्ववर्ती कलमाने आवश्यक केलेल्या गोष्टींच्या अधीनतेने, दोष सिद्ध झालेल्या फौजदारी कैद्यांना कोठड्यांमध्ये एकत्रितपणे किंवा एकेकट्याला किंवा अंशतः एका प्रकारे व अंशतः अन्य प्रकारे ठेवण्यात यावे. **कैद्यांना एकत्र ठेवणे आणि अलग अलग ठेवणे.**

---

१. १९३० चा अधिनियम ६ कलम २ द्वारे " अठरा वर्षे " या शब्दाऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

एकांत बंदिवास. **२९.** कोणतीही कोठडी कैद्याला कारागृहाच्या अधिकाऱ्याशी कोणत्याही वेळी संपर्क साधता येईल अशा प्रकारच्या साधनांनी युक्त असल्याखेरीज एकांत बंदिवासासाठी तिचा वापर केला जाणार नाही, आणि शिक्षा म्हणून किंवा अन्यथा एखाद्या कोठडीत चोवीस तासांपेक्षा जास्त वेळ अशाप्रकारे बंदिस्त केलेल्या प्रत्येक कैद्याला वैद्यकीय अधिकारी किंवा दुय्यम वैद्यकीय कर्मचारी दिवसातून निदान एकदा तरी भेट घेईल.

मृत्युदंडाचे कैदी. **३०.** (१) मृत्युची शिक्षा मिळालेल्या प्रत्येक कैद्याची, शिक्षादेश मिळाल्यानंतर तो कारागृहात येताच तात्काळ तुरुंगाधिकाऱ्याकरवी किंवा त्याच्या आदेशाने, झडती घेण्यात येईल आणि ज्या वस्तू त्या कैद्याच्या ताब्यात ठेवणे तुरुंगाधिकाऱ्याला धोकादायक किंवा अनिष्ट वाटत असेल अशा सर्व वस्तू त्याच्याकडून काढून घेतल्या जातील.

(२) अशा प्रत्येक कैद्याला इतर सर्व कैद्यांपासून वेगळ्या कोठडीत बंदिस्त करण्यात येईल व त्याला रात्रंदिवस पहारेकऱ्याच्या देखरेखीखाली ठेवण्यात येईल.

## प्रकरण सहा

### दिवाणी कैद्यांचे व दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्यांचे अन्न, कपडे व अंथरूण-पांघरूण.

विवक्षित कैद्यांचा खाजगीरीत्या निर्वाह. **३१.** दिवाणी कैद्याला किंवा दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्याला, तपासणी होण्याच्या शर्तीच्या आणि महानिरीक्षकाने मान्य केले असेल त्याप्रमाणे अशा नियमांच्या अधीनतेने, स्वत:चा निर्वाह आणि योग्य वेळी खाजगी रीत्या अन्न, कपडे, अंथरूण-पांघरूण किंवा इतर गरजेच्या वस्तू खरेदी करण्यास किंवा स्वीकारण्यास परवानगी देण्यात येईल.

विवक्षित कैद्यांमध्ये आपापसात अन्न व कपडे बदली करण्यावरील निर्बंध. **३२.** कोणत्याही दिवाणी कैद्याचे किंवा दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्याचे अन्न, कपडे, अंथणरू-पांघरूण किंवा इतर गरजेच्या वस्तू यांचा कोणताही भाग दुसऱ्या कैद्याला देता येणार नाही किंवा भाड्याने देता येणार नाही किंवा विकता येणार नाही ; आणि या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कैद्याला खाजगीरीत्या अन्न खरेदी करण्याची किंवा ते स्वीकारण्याची विशेष सवलत अधीक्षकाला योग्य वाटेल तितक्या कालावधीपुरती गमवावी लागेल.

दिवाणी कैद्यांना आणि दोषसिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्यांना कपडे व अंथरूण-पांघरूण पुरवणे. **३३.** (१) स्वत:साठी पुरेसे कपडे व अंथरूण-पांघरूण यांची सोय करू न शकणाऱ्या प्रत्येक दिवाणी कैद्याला व दोष सिद्ध न झालेल्या कैद्याला आवश्यक असे कपडे व अंथरूण-पांघरूण अधीक्षकामार्फत पुरवण्यात येईल.

(२) एखाद्या खाजगी व्यक्तीच्या बाजूने झालेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी जेव्हा एखाद्या दिवाणी कैद्याला कारागृहात पाठवले गेले असेल तेव्हा, अशी व्यक्ती किंवा तिची प्रतिनिधीच मागणीची लेखी नोटीस मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, त्या कैद्याला अशा रीतीने पुरवण्यात आलेल्या कपड्यांचा आणि अंथरूण-पांघरूणाचा खर्च अधीक्षकाला देईल ; आणि असा खर्च देण्यात कसूर झाल्यास कैद्याला सोडून देण्यात येईल.

## प्रकरण सात

### कैद्यांचे सेवायोजन

दिवाणी कैद्यांचे सेवायोजन. **३४.** (१) दिवाणी कैदी अधीक्षकाच्या परवानगीने काम करू शकतील आणि एखादा व्यापार किंवा व्यवसाय करू शकतील.

(२) ज्यांच्याकडे स्वत:ची उपकरणे असून कारागृहाच्या खर्चाने ज्यांचा निर्वाह होत नसेल अशा दिवाणी कैद्यांना त्यांची संपूर्ण कमाई स्वीकारण्यास परवानगी देण्यात येईल ; पण कारागृहाच्या खर्चाने ज्यांना उपकरणे पुरविण्यात आली आहेत किंवा ज्यांचा निर्वाह चालतो त्यांना मिळणारी कमाई, उपकरणांच्या वापराबद्दल व त्यांच्या निर्वाहाच्या खर्चापोटी अधीक्षक ठरवील तितकी रक्कम तीतून वजा केली जाण्यास अधीन राहील.

फौजदारी कैद्यांचे सेवायोजन. **३५.** (१) सश्रम कारावासाची शिक्षा झालेल्या किंवा स्वत:च्या इच्छेने मजुरी करणाऱ्या कोणत्याही फौजदारी कैद्याला, निकडीच्या वेळी अधीक्षकाची लेखी मंजुरी असेल तर ती बाब खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही एका दिवशी नऊ तासांपेक्षा जास्त वेळ कामाला लावले जाणार नाही.

(२) सश्रम कारावास भोगणारे कैदी कामावर असताना, वैद्यकीय अधिकारी त्यांची वेळोवेळी तपासणी करील आणि कामावर लावलेल्या प्रत्येक कैद्याच्या वृत्तकावर दर पधंरवड्यातून निदान एकदा तरी अशा कैद्याच्या त्यावेळच्या वजनाची नोंद करवील.

(३) कोणत्याही प्रकारच्या किंवा वर्गाच्या श्रमाचे काम करण्यामुळे एखाद्या कैद्याच्या स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होतो असे वैद्यकीय अधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, अशा कैद्याला त्या कामावर ठेवले जाणार नाही तर, वैद्यकीय अधिकाऱ्याचे मते अशा कैद्यासाठी योग्य असेल अशा इतर प्रकारच्या किंवा वर्गाच्या श्रमाच्या कामावर त्याला नेमण्यात येईल.

**३६.** साध्या कारावासाची शिक्षा झालेल्या सर्व फौजदारी कैद्यांच्या सेवायोजनाची तरतूद (त्यांची तशी इच्छा असेपर्यंत) अधीक्षकामार्फत करण्यात येईल; पण, सश्रम कारावासाची शिक्षा न झालेल्या कोणत्याही कैद्याने कामाबाबत हयगय केल्यास, अशा एखाद्या कैद्याने कामाबाबत केलेल्या हयगयीबद्दल कारागृहाने प्रस्थापित केले असतील त्याप्रमाणे त्याच्या नियमात बसेल अशा प्रकारे आहाराच्या प्रमाणात बदल करण्याखेरीज त्याला कसलीही शिक्षा दिली जाणार नाही. **साध्या कारावासाची शिक्षा दिलेल्या फौजदारी कैद्यांचे सेवायोजन.**

## प्रकरण आठ

### कैद्यांचे स्वास्थ्य

**३७.** (१) जे कैदी दुय्यम वैद्यकीय कर्मचाऱ्याला भेटू इच्छितात, अथवा ज्यांच्या मानसिक किंवा शारीरिक स्थितीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे त्या कैद्यांची नावे अशा कैद्यांचा निकटचा प्रभारी अधिकारी याच्यामार्फत तुरुंगाधिकाऱ्याला विनाविलंब कळविण्यात येतील. **आजारी कैदी.**

(२) तुरुंगाधिकारी, जो कोणताही कैदी, दुय्यम वैद्यकीय कर्मचाऱ्याला भेटू इच्छित असेल किंवा जो आजारी आहे किंवा ज्याच्या मानसिक किंवा शारीरिक अवस्थेकडे लक्ष देणे आवश्यक आहे अशा कोणत्याही कैद्याकडे दुय्यम वैद्यकीय कर्मचाऱ्याचे विलंब न करता लक्ष वेधील आणि अशा कोणत्याही कैद्याचे अनुशासन किंवा त्याला द्यावयाची वागणूक यामध्ये करावयाच्या फेरबदलाबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याने किंवा दुय्यम वैद्यकीय कर्मचाऱ्याने दिलेले लेखी निदेश अंमलात आणील.

**३८.** औषधांचा पुरवठा करण्याबाबतचे आदेश किंवा एखाद्या कैद्याच्या बाबतीत वैद्यकीय अधिकाऱ्याने स्वत: किंवा स्वत:च्या देखरेखीखाली अंमलात आणावयाच्या गोष्टींबाबतचे निदेश यांचा अपवाद करता, वैद्यकीय अधिकाऱ्याने किंवा दुय्यम वैद्यकीय कर्मचाऱ्याने दिलेले सर्व निदेश कैद्याच्या वृत्तकावर किंवा राज्य शासन नियमान्वये निदेशित करील अशा इतर अभिलेखांमध्ये रोजच्या रोज नोंदण्यात येतील, आणि तुरुंगाधिकारी प्रत्येक निदेशाच्या बाबतीत त्याचे पालन झाले किंवा झाले नाही या गोष्टींचा उल्लेख करून त्याला आवश्यक वाटतील अशा इतर अभिप्रायांसह, योग्य ठिकाणी त्याची नोंद करील व नोंदीची तारीख नमूद करील. **वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निदेशांची नोंद.**

**३९.** प्रत्येक कारागृहामध्ये एखाद्या रुग्णालयाची किंवा आजारी कैद्याला ठेऊन घेण्यासाठी योग्य जागेची सोय करण्यात येईल. **रुग्णालय.**

## प्रकरण नऊ

### कैद्यांच्या भेटी घेणे

**४०.** दिवाणी कैदी किंवा दोष सिद्ध न झालेले फौजदारी कैदी ज्या व्यक्तींशी संपर्क साधू इच्छितात, त्या व्यक्तींना योग्य वेळी आणि योग्य निर्बंधाखाली प्रवेश देण्यासाठी प्रत्येक कारागृहात योग्य व्यवस्था करण्यात येईल, मात्र न्यायचौकशीअधीन कैदी योग्य अर्हताप्राप्त अशा आपल्या विधि सल्लागारांना इतर कोणतीही व्यक्ती उपस्थित नसतांना भेटू शकतील या गोष्टीची न्यायहिताशी सुसंगत असेल तितपत काळजी घेतली जाईल. **दिवाणी कैद्यांच्या आणि दोष सिद्ध न झालेल्या फौजदारी कैद्यांच्या भेटी घेणे.**

**४१.** (१) तुरुंगाधिकारी, कैद्याला भेटावयाला येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे नाव व पत्ता विचारू शकेल आणि तुरुंगाधिकाऱ्याला संशय घेण्यास आधार असेल तर, तो भेट मागणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची झडती घेऊ शकेल किंवा करवू शकेल, मात्र कोणत्याही कैद्याच्या किंवा भेटीसाठी आलेल्या दुसऱ्या व्यक्तीच्या समक्ष झडती घेतली जाणार नाही. **भेटीला येणाऱ्या व्यक्तींची झडती.**

(२) भेटीला आलेल्या अशा एखाद्या व्यक्तीने स्वत:ची झडती घेऊ देण्यास नकार दिला तर, तुरुंगाधिकारी त्याला प्रवेश नाकारू शकेल; आणि अशा कार्यवाहीमागील कारणे त्यांच्या तपशीलासह, राज्य शासन निदेशित करील अशा अभिलेखात नमूद करण्यात येतील.

## प्रकरण दहा

### कारागृहांच्या संबंधातील अपराध

**४२.** कलम [१][५९] खाली एखाद्या नियमाविरुद्ध जो कोणी, कोणतीही प्रतिषिद्ध वस्तू कारागृहात आणील किंवा तेथून बाहेर नेईल अथवा कशाच्याही सहाय्याने ती तेथे आणण्याचा किंवा तेथून नेण्याचा प्रयत्न करील अथवा कारागृहाच्या सीमेबाहेर एखाद्या कैद्याला ती वस्तू पुरवील किंवा पुरविण्याचा प्रयत्न करील तो, आणि अशा एखाद्या नियमांविरुद्ध अशी एखादी वस्तू कारागृहात आणली अथवा तेथून बाहेर नेलेली असता अथवा एखाद्या कैद्याने ती जवळ बाळगलेली असता किंवा कारागृहाच्या सीमेबाहेरील एखाद्या कैद्याला ती पुरविली गेली असता जो ते समजूनसवरून खपवून घेईल असा कारागृहाचा प्रत्येक अधिकारी, आणि अशा नियमाविरुद्ध जो कोणी एखाद्या **प्रतिषिद्ध वस्तू कारागृहात आणणे किंवा कारागृहातून नेणे व कैद्यांशी संपर्क साधणे याबद्दल शास्ती.**

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " ६० " ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

कैद्याशी संपर्क साधील किंवा साधण्याचा प्रयत्न करील तो, आणि जो कोणी, या कलमान्वये शिक्षापात्र केलेल्या गुन्ह्याला अपप्रेरणा देईल तो, दंडाधिकाऱ्यासमोर दोष सिद्धि झाल्यावर,सहा महिन्यांपेक्षा जास्त नसेल एवढ्या मुदतीच्या कारावासास किंवा दोनशे रुपयांहून जास्त नसेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांना पात्र असेल.

**कलम ४२ खालील अपराधाबद्दल अटक करण्याचा अधिकार.**

**४३.** जेव्हा एखादी व्यक्ती लगतपूर्ववर्ती कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेला एखादा अपराध कारागृहाच्या एखाद्या अधिकाऱ्याच्या समक्ष करील आणि अशा अधिकाऱ्याने विचारले असता आपले नाव व राहण्याचे ठिकाण सांगण्यास नकार देईल किंवा जे खोटे आहे हे अशा अधिकाऱ्याला माहीत आहे किंवा तसे समजण्यास त्याला कारण आहे असे नाव किंवा राहण्याचे ठिकाण सांगील तेव्हा, असा अधिकारी तिला अटक करू शकेल आणि अनावश्यक विलंब न लावता त्या व्यक्तीला पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील, आणि तदनंतर असा पोलीस अधिकारी तो अपराध जणू काही त्याच्याच समक्ष घडला असावा त्याप्रमाणे कार्यवाही करील.

**शास्ती जाहीर करणे.**

**४४.** अधीक्षक कारागृहाच्या बाहेर सहज दृश्यजागी कलम ४२ अन्वये प्रतिषिद्ध असलेल्या कृती व त्या केल्याबद्दल होणारी शास्ती नमूद करणारी नोटीस इंग्रजीमध्ये आणि स्थानिक भाषेत लावून ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण अकरा

### कारागृह-अपराध

**कारागृह-अपराध.**

**४५.** खालील कृती एखाद्या कैद्याने केल्या असता त्या कारागृह-अपराध ठरतील असे घोषित करण्यात येत आहे :—

(१) कलम ५९ अन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे जी कारागृह-अपराध म्हणून जाहिर केली जाईल अशी कारागृहाच्या कोणत्याही विनिमयाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा;

(२) कोणत्याही प्रकारचा हल्ला किंवा फौजदारी बलप्रयोग;

(३) अपमानास्पद किंवा धमकीची भाषा वापरणे;

(४) अनैतिक किंवा असभ्य किंवा बेशिस्त वर्तणूक;

(५) श्रमाच्या कामासाठी बुद्धिपुरस्सर स्वतःला असमर्थ करून घेणे;

(६) काम करण्यास हट्टीपणाने नकार देणे ;

(७) योग्य प्राधिकाराशिवाय हातकड्या, बेड्या किंवा गज कानसणे, कापणे, बदलणे, किंवा काढून टाकणे;

(८) सश्रम कारावासाची शिक्षा झालेल्या कोणत्याही कैद्याने कामासंबंधात बुद्धिपुरस्सर आळशीपणा किंवा हयगय करणे;

(९) सश्रम कारावासाची शिक्षा झालेल्या कोणत्याही कैद्याने कामामध्ये बुद्धिपुरस्सर गैरव्यवस्था करणे;

(१०) कारागृहाच्या मालमत्तेचे बुद्धिपुरस्सर नुकसान करणे;

(११) वृत्तके, अभिलेख व दस्तऐवज यात गैरफेर करणे किंवा ते विरूपित करणे;

(१२) कोणतीही प्रतिषिद्ध वस्तू स्वीकारणे, जवळ बाळगणे किंवा हस्तांतरित करणे;

(१३) आजारीपणाचे सोंग करणे;

(१४) कोणताही अधिकारी किंवा कैदी यांच्याविरुद्ध बुद्धिपुरस्सर खोटा आरोप करणे;

(१५) एखाद्या ठिकाणी लागलेली आग, एखादा कट किंवा कारस्थान, एखाद्याचे पलायन, पळून जाण्याचा प्रयत्न किंवा पळून जाण्याची तयारी आणि एखाद्या कैद्यावर किंवा कारागृहाच्या एखाद्या अधिकाऱ्यावर हल्ला किंवा हल्ल्याची तयारी अशा गोष्टी आपल्या लक्षात आल्यानंतर त्या लगेच वरिष्ठांना कळविण्याचे टाळणे किंवा कळविण्यास नकार देणे; आणि

(१६) पळून जाण्याचे कारस्थान करणे किंवा पळून जाण्यास मदत किंवा पूर्वोक्त अपराधांपैकी इतर कोणताही अपराध करणे.

**४६.** अधीक्षक, अशा अपराधाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीची तपासणी घेऊ शकेल आणि त्यावर निर्णय देऊन अशा अपराधांबद्दल पुढील प्रकारे शिक्षा करू शकेल :—

**अशा अपराधांबद्दल शिक्षा.**

(१) औपचारिक ताकीद देऊन ;

**स्पष्टीकरण.**— " औपचारिक ताकीद " याचा अर्थ, अधीक्षकाने कैद्याला व्यक्तिशः दिलेली आणि शिक्षा-पुस्तकात व तसेच कैद्याच्या वृत्तकावर नोंदलेली ताकीद, असा असेल ;

(२) [[1][[2] राज्य शासनाने ] केलेल्या नियमांद्वारे विहित केले असेल त्याप्रमाणे तितका काळ] अधिक वैताग आणणाऱ्या किंवा अधिक कष्टाच्या कामावर बदली करून ;

(३) सश्रम कारावासाची शिक्षा न झालेल्या, दोष सिद्ध झालेल्या फौजदारी कैद्याच्या बाबतीत, सात दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ काबाडकष्टाचे काम देऊन ;

(४) त्या त्या काळी अंमलात असलेल्या सूट पद्धतीनुसार अनुज्ञेय असलेल्या विशेषाधिकारापासून [2][राज्य शासनाने ] केलेल्या नियमांमध्ये विहित केले असेल त्याप्रमाणे तितपत हानी करून ;

(५) गोणपाट किंवा इतर जाड्याभरड्या बिनलोकरीच्या कापडाचे कपडे, तीन महिन्यांपेक्षा अधिक नाही इतका काळ, घालावयास देऊन ;

(६) [2][राज्य शासनाने ] केलेल्या नियमांमध्ये विहित केले असेल त्याप्रमाणे अशा प्रकारे आणि तितका काळ आणि तशा नमुन्याच्या व तितक्या वजनाच्या हातकड्या अडकवून ;

(७) [2][राज्य शासनाने ] केलेल्या नियमांद्वारे विहित केले असेल त्याप्रमाणे अशा प्रकारे आणि तितका काळ आणि तशा नमुन्याच्या व तितक्या वजनाच्या बेड्या अडकवून ;

(८) [3][तीन] महिन्यांपेक्षा अधिक नाही इतका काळ अलग बंदिवासात ठेऊन ;

**स्पष्टीकरण.**— अलग बंदिवास याचा अर्थ, ज्यामुळे एखाद्या कैद्याला सश्रम किंवा विनाश्रम असा बंदिवास, मग तो इतर कैद्यांच्या संपर्कापासून दूर पण, त्यांच्या दृष्टीआड नव्हे, अशा रितीने अलग ठेवला जातो; आणि त्याला दररोज एक तासापेक्षा कमी नाही, इतका वेळ व्यायाम करण्यास व एका किंवा अधिक कैद्यांसमवेत जेवण घेण्यास परवानगी मिळते असा बंदिवास, असा आहे ;

(९) **शिक्षा आहार.**— राज्य शासनाने मजुरीच्या कामाच्या संबंधात विहित केले असेल त्याप्रमाणे अशा प्रकारे व अशा शर्तींच्या अधीनतेने, आहारावर निर्बंध घालून :

परंतु, आहारावरील असे निर्बंध कोणत्याही बाबतीत एखाद्या कैद्यास सलग शहाण्णव तासांहून अधिक तास लागू होणार नाहीत आणि नवीन अपराध वगळता जोवर एका आठवड्याचा काळ उलटत नाही तोवर त्याची पुनरावृत्ती करता येणार नाही.

(१०) चौदा दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ कोठडी-बंदिवास :

परंतु, कोठडी-बंदिवासाच्या प्रत्येक कालावधीनंतर, कैद्याला पुन्हा कोठडी-बंदिवासाची किंवा एकांत बंदीवासाची शिक्षा दिली जाण्यापूर्वी अशा कालावधीपेक्षा कमी नाही इतका काळ लोटला पाहिजे :

**स्पष्टीकरण.**— कोठडी बंदिवास याचा अर्थ, ज्यामुळे कैदी इतर कैद्यांच्या संपर्कापासून दूर पण, त्यांच्या दृष्टीआड नव्हे, अशा रितीने संपूर्णपणे अलग ठेवला जातो ; असा सश्रम किंवा विनाश्रम बंदीवास, असा आहे :

[4] * * * *

[4][(११)] [5] * * * * [6][कोठडीतील] बंदिवासासह खंड (९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शिक्षा आहार ;

[4][(१२)] फटके मारण्याची शिक्षा, परंतु तीस पेक्षा अधिक फटके मारले जाणार नाहीत :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणताही स्त्री-कैदी किंवा दिवाणी कैदी कोणत्याही प्रकारच्या हातकड्या किंवा बेड्या घातल्या जाण्यास, फटके बसण्यास पात्र ठरणार नाही.

**४७.** [3][(१)] अशा कोणत्याही अपराधाबद्दल लगतपूर्ववर्ती कलमामध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही दोन शिक्षा, पुढील अपवाद वगळता एकत्रितपणे देता येतील :—

**कलम ४६ खालील शिक्षेचे बहुत्व.**

---

१. १९२५ चा अधिनियम १७, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " गव्हर्नर जनरल इन कौन्सिल " साठी बदली दाखल करण्यात आले.

३. १९२५ चा अधिनियम १७ कलम २ द्वारे " सहा " याऐवजी बदली दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे खंड (११) निरसित आणी खंड (१२) व (१३) यांना असे (११) व (१२) असे क्रमांक देण्यात आले.

५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे " एकांतपरिरोध " या मूळ शब्दाऐवजी हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे " खंड (११) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे " मजकूर वगळण्यात आला.

(१) औपचारिक ताकीद ही शिक्षा, त्या कलमातील खंड (४) अन्वये विशेषाधिकारापासून वंचित करण्याच्या शिक्षेखेरीज इतर कोणत्याही शिक्षेच्या जोडीने दिली जाणार नाही ;

(२) शिक्षा आहाराच्या शिक्षेची सांगड त्या कलमाच्या खंड (२) अन्वये मजुरीच्या कामात बदल करण्याशी घालता येणार नाही आणि त्याचबरोबर देण्यात आलेली नुसत्या शिक्षा आहाराची शिक्षाही [१][कोठडी] बंदिवासासह कोणत्याही अतिरिक्त कालावधीच्या शिक्षा आहाराच्या कालावधीच्या जोडीने देता येणार नाही.

[२][(३)] कैदी ज्याला पात्र असेल असा अलग बंदिवासाचा एकूण कालावधी वाढेल अशा प्रकारे कोठडी-बंदिवासाची अलग बंदिवासाच्या शिक्षेशी सांगड घातली जाणार नाही.]

(४) फटके मारण्याच्या शिक्षेची सांगड, कोठडी [३][आणि] अलग बंदिवासाची शिक्षा व सूट पद्धतीखाली लागू असणारे विशेषाधिकार काढून घेण्याची शिक्षा वगळता, अन्य कोणत्याही शिक्षेशी घालता येणार नाही.

[४][(५) [५][राज्य शासनाने] केलेल्या नियमांचे उल्लंघन करून, कोणतीही शिक्षा दुसऱ्या शिक्षेबरोबर जोडली जाणार नाही.]

[४][(२) अशा कोणत्याही अपराधाबद्दल एकत्रितपणे देता येत नाहीत अशा दोन शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा अशा कोणत्याही अपराधाबद्दल दिलेल्या शिक्षेशी जोडली जाईल अशा प्रकारे दिली जाणार नाही.]

**कलमे ४६ व ४७ खालील शिक्षा.**

**४८.** (१) वरील पूर्ववर्ती दोन कलमांमध्ये नमूद केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्याचा अधीक्षकाला अधिकार असेल, मात्र एक महिन्याहून अधिक मुदतीच्या अलग बंदिवासाच्या बाबतीत, महानिरीक्षकाने तो शिक्षादेश कायम केलेला असला पाहिजे.

(२) अधीक्षकाला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला कोणतीही शिक्षा देण्याचा अधिकार असणार नाही.

**शिक्षा पूर्ववर्ती कलमांना अनुसरून असणे.**

**४९.** न्यायालयाचा आदेश असल्याखेरीज, कोणत्याही कैद्याला पूर्ववर्ती कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांखेरीज, इतर कोणतीही शिक्षा दिली जाणार नाही आणि त्या कलमाच्या तरतुदींनुसार असेल त्याखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे कोणत्याही कैद्याला कसलीही शिक्षा दिली जाणार नाही.

**कैदी शिक्षेसाठी पात्र ठरत असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित करणे.**

**५०.** (१) दंडित आहाराची कोणतीही शिक्षा मग ती नुसती असो किंवा फटक्यांच्या शिक्षेच्या जोडीने असो–ती किंवा कलम ४६, खंड (२) अनुसार मजुरीचे काम बदलण्याची शिक्षा ही ज्या कैद्याला दिली असेल, त्या कैद्याची वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासणी केल्याशिवाय ही शिक्षा अंमलात आणली जाणार नाही, आणि तो कैदी शिक्षा भोगण्यास पात्र आहे असे वैद्यकीय अधिकाऱ्याचे मत असल्यास, तो कलम १२ मध्ये विहित केलेल्या शिक्षा पुस्तकातील योग्य स्तंभामध्ये तसे प्रमाणित करील.

(२) दिलेली शिक्षा भोगण्यास कैदी अपात्र आहे असे वाटल्यास तो स्वतःचे मत त्याचपद्धतीने लेखी नोंदवील आणि तो कैदी त्याप्रकारची शिक्षा भोगण्यास सर्वस्वी अपात्र आहे की शिक्षेत काही बदल आवश्यक वाटतो ते नमूद करील.

(३) नंतरच्या प्रकरणामध्ये, कैद्याच्या स्वास्थ्याला धक्का न पोचता कोणत्या मर्यादेपर्यंत तो शिक्षा भोगू शकेल हे तो अधिकारी नमूद करील.

**शिक्षा पुस्तकातील नोंदी.**

**५१.** (१) कलम १२ खाली विहित केलेल्या शिक्षा पुस्तकात, दिलेल्या प्रत्येक शिक्षेच्या बाबतीत कैद्याचे नाव, त्याचा नोंदवही क्रमांक व तो ज्या वर्गाचा आहे तो वर्ग ( सराईत आहे किंवा नाही), तो ज्याबद्दल दोषी आहे तो कारागृह-अपराध, ज्या दिवशी असा कारागृह-अपराध केला तो दिनांक, त्या कैद्याच्या नावासमोर नमूद केलेल्या पूर्वीच्या कारागृह अपराधांची संख्या आणि लगतपूर्वीच्या कारागृह-अपराधाचा दिनांक, दिलेली शिक्षा व ती देण्यात आल्याचा दिनांक नमूद करण्यात येईल.

---

१. १९२५ चा अधिनियम १७, कलम ३ द्वारे " एकांतपरिरोध " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळच्या (३) या अपवादाऐवजी बदली दाखल करण्यात आले.

३. १९१४ चा अधिनियम १०, कलम २ आणि अनुसूची एक याद्वारे " किंवा " या शब्दाऐवजी " आणि " हा शब्द घातला.

४. १९२५ चा अधिनियम १७, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

५. विधि अनुकूलन आदेश, १९३७ व विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " गव्हर्नर जनरल इन कौन्सिल, " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला .

(२) प्रत्येक गंभीर अशा कारागृह- अपराधाच्या बाबतीत, अपराध शाबीत करणाऱ्या साक्षीदारांची नावे नमूद करण्यात येतील, आणि, ज्या अपराधाच्या बाबतीत फटके मारण्याची शिक्षा देण्यात आलेली असेल त्या बाबतीत अधीक्षक, साक्षीदारांच्या साक्षी पुराव्याचा सारांश, कैद्याचा बचाव व त्यावरील त्याचे निष्कर्ष कारणांसहित नमूद करील.

(३) प्रत्येक शिक्षेसंबंधीच्या नोंदीसमोर, तुरुंगाधिकारी व अधीक्षक त्या नोंदी अचूक असल्याचा साक्षीपुरावा म्हणून आपापली आद्याक्षरी करतील.

**घृणास्पद अपराध घडून आला असता अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**५२.** एखादा कैदी कारागृहाच्या अनुशासनाविरुद्ध अपराध केल्याबद्दल दोषी असून, त्याने असे अपराध वारंवार केले असल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे अधीक्षकाच्या मते, त्याला जी शिक्षा या अधिनियमाखाली प्रदान करण्याचा अधिकार आहे तेवढी शिक्षा पुरेशी नसेल तर, ती परिस्थिती निवेदन करून अधीक्षक अशा कैद्याला अशी अधिकारिता असलेल्या कोणत्याही जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या [१][किंवा इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या] न्यायालयात पाठवू शकेल आणि तदनंतर असा दंडाधिकारी अशा तऱ्हेने चौकशी करून त्या कैद्याविरुद्ध केलेल्या दोषारोपाबाबत न्यायचौकशी करील आणि दोष सिद्ध झाल्यास असा अपराध करण्याच्या वेळी तो भोगत असलेल्या शिक्षेच्या जोडीला एका वर्षपर्यंत वाढविता येईल अशी कारावासाची शिक्षा देऊ शकेल, किंवा कलम ४६ मध्ये नमूद केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देऊ शकेल :

[२][परंतु, असे कोणतेही प्रकरण जिल्हा दंडाधिकाऱ्याला कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याकडे आणि मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याला अन्य कोणत्याही इलाखा शहर दंडाधिकाऱ्याकडे चौकशीसाठी व न्यायचौकशीसाठी हस्तांतरित करता येईलः ]

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीला त्याच अपराधाबद्दल दोनदा शिक्षा दिली जाणार नाही.

**फटके मारणे.**

**५३.** (१) फटके मारण्याची कोणतीही शिक्षा ही हप्त्याहप्त्याने किंवा अधीक्षक व वैद्यकीय अधिकारी किंवा दुय्यम वैद्यकीय कर्मचारी याच्या उपस्थितीखेरीज देता येणार नाही.

(२) फटके मारण्याची शिक्षा ही अर्ध्या इंचापेक्षा कमी नसणाऱ्या व्यासाच्या हलक्या दंडुक्याने पृष्ठभागावर मारून देण्यात येईल आणि सोळा वर्षाखालील वयाच्या कैद्यांच्या बाबतीत ही शिक्षा शाळेतील अनुशासनानुसार त्याहून हलक्या दंडुक्याने देण्यात येईल.

**कारागृहाच्या दुय्यम कर्मचाऱ्यांनी केलेले अपराध.**

**५४.** (१) जो कर्तव्यभंगाबद्दल अगर सक्षम प्राधिकरणाने केलेल्या एखाद्या नियमाचा किंवा विनियमाचा किंवा दिलेल्या विधियुक्त आदेशाचा बुद्धिपुरस्सर भंग केल्याबद्दल किंवा त्याबाबत हयगय केल्याबद्दल दोषी असेल अथवा दोन महिने इतका काळ परवानगीशिवाय किंवा तसा आपला विचार असल्याबद्दल लेखी पूर्वसूचना न देता आपल्या पदीय कामांमधून अंग काढून घेईल किंवा त्याला मंजूर केलेल्या रजेपेक्षा बुद्धिपुरस्सर जास्त काळ अनुपस्थित राहील अथवा जो आपल्या कारागृहविषयक कर्तव्यांहून वेगळ्या अशा एखाद्या सेवेमध्ये स्वतःला प्राधिकाराशिवाय गुंतवून घेईल अथवा भ्याडपणाच्या कृत्याबद्दल दोषी असेल असा प्रत्येक तुरुंगाधिकारी किंवा कारागृहाचा दुय्यम अधिकारी, दंडाधिकाऱ्यासमोर दोष सिद्ध झाल्यास, दोनशे रुपयांपेक्षा जास्त नाही इतक्या द्रव्यदंडास किंवा तीन महिन्यांपेक्षा जास्त नाही इतक्या कारावासास किंवा दोन्ही शिक्षांना पात्र होईल.

(२) कोणत्याही व्यक्तीला या कलमाखाली त्याच अपराधाबद्दल दोनदा शिक्षा दिली जाणार नाही.

## प्रकरण बारा

### संकीर्ण

**कैद्यांची बहिःशाल अभिरक्षा, नियंत्रण व रोजगार.**

**५५.** एखाद्या कैद्याला कायदेशीररीत्या जेथे बंदिवासात ठेवण्यात आलेले असेल त्या कारागृहात त्याला आणताना किंवा अशा कारागृहातून त्याला बाहेर नेताना अथवा तो अशा कोणत्याही कारागृहाच्या कारागृह-अधिकाऱ्याच्या कायदेशीर अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली अशा कारागृहाबाहेर काम करीत असेल किंवा अन्यथा तो कारागृहाच्या हद्दीबाहेर असेल तेव्हा, तो कारागृहातच आहे असे मानले जाईल आणि जणू काही तो प्रत्यक्ष कारागृहातच असावा त्याप्रमाणे सर्व तदनुषंगिक गोष्टींच्या अधीन राहील.

**बेड्या घालून बंदिस्त करणे.**

**५६.** जेव्हा जेव्हा (कारागृहाची अवस्था किंवा कैद्यांचे आचरण यापैकी कोणत्याही एका गोष्टीच्या संदर्भात) कोणत्याही कैद्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी त्यांना बेड्या घालून बंदिस्त करणे आवश्यक आहे असे अधीक्षकाला वाटेल तेव्हा, तो राज्य शासनाच्या मंजुरीने महानिरीक्षकाने घालून दिले असेल त्याप्रमाणे अशा नियमांच्या आणि अनुदेशांच्या अधीनतेने, त्या कैद्यांना त्याप्रमाणे बंदिस्त करू शकेल.

---

१. १९१० चा अधिनियम १३, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १९१० चा अधिनियम १३, कलम २ द्वारे मूळ परंतुकाऐवजी दाखल करण्यात आले.

**काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांना बेड्या घालून बंदिस्त करणे.**

**५७.** (१) काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांना, कलम [१][५९] खाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कारागृहात दाखल केल्यानंतरच्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये बेड्या घालून बंदिस्त करता येईल.

(२) खुद्द कैद्याच्या सुरक्षित ताब्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी, अशा कोणत्याही कैद्याच्या बेड्या तीन महिन्यांपेक्षा जास्त काळपर्यंत ठेवणे आवश्यक आहे असे अधीक्षकाला वाटल्यास, त्याला आवश्यक वाटत असेल तितका काळ बेड्या ठेवण्यास मंजुरी मिळविण्यासाठी तो महानिरीक्षकाकडे अर्ज करील, आणि महानिरीक्षक तदनुसार अशा रीतीने बेड्या ठेवण्यास मंजुरी देऊ शकेल.

**आवश्यक असल्याखेरीज तुरुंगाधिकाऱ्यांनी कैद्यांना बेड्या अडकवू नयेत.**

**५८.** अत्यंत गरज असल्याशिवाय तुरुंगाधिकारी स्वतःच्या अधिकारात कोणत्याही कैद्याला बेड्या अडकवणार नाही, किंवा यांत्रिक साधनांनी अडकवून ठेवणार नाही आणि तसे असल्यास, अधीक्षकाला तात्काळ त्याची नोटीस देण्यात येईल.

**नियम करण्याचा अधिकार.**

**५९.** [२][(१)] [३][राज्य शासन], [४][**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे] या अधिनियमाशी सुसंगत असेल असे पुढील प्रकारचे नियम करू शकेल :—

(१) कारागृह- अपराध ठरतील अशा कृत्यांची व्याख्या करणारे ;

(२) कारागृह- अपराधांचे गंभीर आणि किरकोळ असे वर्गीकरण ठरवून देणारे ;

(३) कारागृह- अपराधांबद्दल या अधिनियमान्वये अनुज्ञेय अशा ज्या शिक्षा येतील त्या किंवा त्यांचे वर्ग ठरविणारे ;

(४) जी कृत्ये म्हणजे कारागृह-अपराध असून भारतीय दंड संहिता ( १८६० चा ४५) याखालीही अपराध म्हणून गणली जावीत किंवा गणली जाऊ नयेत ते जाहीर करणारे ;

(५) गुण देणारे आणि शिक्षा कमी करणारे ;

(६) काही उठाव झाल्यास किंवा पळून जाण्याचा प्रयत्न झाल्यास, एखाद्या कैद्याविरुद्ध, किंवा कैद्यांच्या गटाविरुद्ध शस्त्रांचा वापर करण्याबाबत विनियमन करणारे ;

(७) मृत्यूचा धोका असलेल्या कैद्यांना केव्हा व कसे सोडून देता येईल ती परिस्थिती निश्चित करणारे व तशा शर्तींचे विनियमन करणारे ;

[५][(८)] कारागृहांचे वर्गीकरण आणि कक्ष, कोठड्या आणि बंदिस्त करण्याच्या इतर जागा यांचे वर्णन व बांधकाम यांबाबतचे ;

(९) कारागृहांच्या प्रत्येक वर्गामध्ये ठेवावयाच्या कैद्यांची, किंवा शिक्षांची संख्या, मुदत किंवा स्वरूप यांच्या आधारे किंवा अन्य प्रकारे विनियमन करणारे ;

(१०) कारागृहाचे प्रशासन आणि या अधिनियमान्वये नियुक्त केल्या जाणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची नियुक्ती यांबाबतचे ;

(११) फौजदारी कैद्यांचे आणि जे स्वखर्चाने निर्वाह चालवितात त्यांखेरीज इतर दिवाणी कैद्यांचे अन्न, अंथरूण, पांघरूण व कपडे यांबाबतचे ;

(१२) कारागृहाच्या आत किंवा त्याबाहेर असताना सिद्ध दोष कैद्यांचे सेवायोजन, अनुदेश व नियंत्रण यांबाबतचे ;

(१३) योग्य प्राधिकाराशिवाय ज्या वस्तू कारागृहांत आणणे किंवा कारागृहांबाहेर नेणे प्रतिषिद्ध आहेत, अशा वस्तू ठरवून देणारे ;

(१४) मजुरीच्या प्रकारांचे वर्गीकरण करून ते विहित करणारे आणि मजुरीतील विश्रांतीचा कालावधी विनियमित करणारे ;

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे “ ६० ” ऐवजी दाखल करण्यात आले.

२. १९८६ चा अधिनियम क्रमांक ४, कलम २ व अनुसूची याद्वारे या कलमाला पोटकलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात आला (१५ मे १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

४. १९८६ चा अधिनियम क्रमांक ४, कलम २ व अनुसूची याद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१५ मे १९८६ रोजी व तेव्हापासून).

५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ खंड (८) व (९) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

(१५) कैद्यांच्या सेवायोजनाने मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग करण्याबाबत विनियमन करणारे ;

(१६) काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांना बेड्या घालून बंदिस्त करण्याबाबत विनियमन करणारे ;

(१७) कैद्यांचे वर्गीकरण आणि त्यांना अलग करणे यांबाबतचे ;

(१८) दोष सिद्ध झालेल्या फौजदारी कैद्यांना बंदिस्त करण्याबाबत कलम २८ अन्वये विनियमन करणारे ;

(१९) वृत्तके तयार करून ती ठेवण्याबाबतचे ;

(२०) कारागृहांचे अधिकारी म्हणून कैद्यांची निवड व नियुक्ती करण्याबाबतचे ;

(२१) चांगल्या वर्तणुकीबद्दल बक्षीसे देण्याबाबतचे ;

(२२) ज्यांची काळ्या पाण्याच्या शिक्षेची किंवा कैदेची मुदत संपत आली आहे अशा कैद्यांना स्थानांतरित करण्याबाबत विनियमन करणारे ; मात्र ज्या अन्य कोणत्याही राज्याकडे स्थानांतरित करावयाचे असेल त्या राज्याच्या राज्य शासनाची संमती लागेल;

(२३) कारागृहात बंदिस्त केलेल्या गुन्हेगार वेड्यांवर किंवा बऱ्या झालेल्या गुन्हेगार वेड्यांवर उपचार करणे, स्थानांतरित करणे व व्यवस्था लावणे याबाबतचे ;

(२४) कैद्यांची अपिले व विनंतीअर्ज पुढे पाठविणे आणि त्यांचा आपल्या मित्रांशी संपर्कव्यवहार यांचे विनियमन करणारे;

(२५) कारागृहास भेट देणाऱ्या अभ्यागतांची भेटीची वेळ ठरविणे व त्यांना मार्गदर्शन करणे याविषयीचे ;

(२६) हा अधिनियम आणि त्याखाली केलेल्या नियमांतील कोणत्याही किंवा सर्व नियमांच्या तरतुदी दुय्यम तुरुंगांना किंवा [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२ ( १८८२ चा १०), कलम ५४१ अनुसार नियत केलेल्या खास बंदिशाळांना आणि तेथे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना व कैद केलेल्या कैद्यांना लागू करण्याविषयीचे ;

(२७) कैद्यांना दाखल करून घेणे, त्यांची अभिरक्षा, सेवायोजन, आहार, त्यांच्याशी वागणूक व मुक्तता यांबाबतचे ; आणि

(२८) सर्वसाधारणपणे या अधिनियमाची उद्दिष्टे अंमलात आणणारे,]

[२][(२) या कलमा अन्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर लवकरात लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.]

**६०.** [३][स्थानिक शासनाचा नियम करण्याचा अधिकार] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित.

**नियमांच्या प्रती प्रदर्शित करणे.**

**६१.** [४][कलम ५९] खालील नियम कारागृहांच्या प्रशासनाशी संबंधित असतील तेथवर, त्यांच्या प्रती इंग्रजीत व स्थानिक भाषेत आणि कारागृहात कामाला असलेल्या सर्व लोकांना जेथे प्रवेश मिळू शकतो अशा ठिकाणी प्रदर्शित करण्यात येतील.

**अधीक्षक आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारांचा वापर करणे.**

**६२.** या अधिनियमाद्वारे अधीक्षक किंवा वैद्यकीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर आणि त्यांना नेमून दिलेल्या कर्तव्यांचे पालन, त्यांच्या अनुपस्थितीत याबाबतीत राज्य शासन नेमून देईल अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याला त्याच्या नावाचा किंवा पदनामाचा निर्देश करून करता येईल आणि कर्तव्ये पार पाडता येतील.

**अनुसूची** :[कायदे निरसित]

निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा एक), क. २ व अनुसूचीद्वारे निरसित.

---

१. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ( १८९८ चा ५) यांच्या संबद्ध तरतुदींच्या संदर्भाधीन.

२. १९८६ चा अधिनियम ४,कलम २ व अनुसूची यांद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला ( दि. १५ मे १९८६ रोजी व तेव्हापासून).

३. हे कलम, त्यात किंचितसा बदल करून कलम ५९ च्या (८) ते (२७) या खंडामध्ये अंतर्भूत करण्यात आले आहेत.

४. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे कलमे ५९ व ६० या शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

# कारागृहे अधिनियम, १८९४
# The Prisons Act, 1894

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| accomodation for prisoners | कैद्यांची सोय | [ sec. 4 ] |
| admission, removal and discharge of prisoners | कैद्यांना दाखल करून घेणे, हलवणे व मुक्त करणे | [ chapter IV ] |
| association and segregation (of prisoners) | (कैद्यांना) एकत्र ठेवणे आणि अलग अलग ठेवणे | [ sec. 28 M.N. ] |
| attempt to escape | पळून जाण्याचा प्रयत्न | [ sec. 59(*6*) ] |
| cellular confinement | कोठडी-बंदिवास | [ sec. 46(*10*) ] |
| confinement in iron | बेड्या घालून बंदिस्त करणे | [ sec. 56 ] |
| convict Officer | दोष सिद्ध झालेला अधिकारी | [ sec. 23 M.N. ] |
| criminal force | फौजदारी बलप्रयोग | [ sec. 45(*2*) ] |
| criminal prisoner | फौजदारी कैदी | [ sec. 3(*2*) ] |
| employment of civil prisoners | दिवाणी कैद्यांचे सेवायोजन | [ sec. 34 M.N. ] |
| employment of criminal prisoners | फौजदारी कैद्यांचे सेवायोजन | [ sec. 35 M.N. ] |
| Exhibition of copies of rules | नियमांच्या प्रती प्रदर्शित करणे | [ sec. 61 ] |
| formal warning | औपचारिक ताकीद | [ sec. 46(*1*) ] |
| history-ticket | वृत्तक | [ sec. 3(*6*) ] |
| in conspicuous place | सहज दृष्यजागी | [ sec. 44 ] |
| Inspector General | महानिरीक्षक | [ sec. 5 ] |
| jail | तुरुंग | [ Sec. 16 ] |
| jailor | तुरूंगाधिकारी | [ sec. 16 ] |
| maintenance of certain prisoners from private sources | विविक्षित कैद्यांचा खाजगीरीत्या निर्वाह | [ sec. 31 ] |
| maintenance of Prisons | कारागृहांची देखभाल | [Chapt. II ] |
| medical subordinate | दुय्यम वैद्यकीय कर्मचारी | [ sec. 3(*8*) ] |
| officers of prisons | कारागृहांचे अधिकारी | [ sec. 6 ] |
| outbreak | उठाव | [ sec. 59(6) ] |
| Penal diet | शिक्षा आहार | [ sec. 46(*9*) ] |
| Plurality of punishment | शिक्षेचे बहुत्व | [ sec. 47 M.N. ] |
| Prison | कारागृह | [ sec. 3(*1*) ] |
| prisoners to be examined on admission | दाखल केल्यानंतर कैद्यांची तपासणी करणे | [ sec. 24 ] |
| prisoner under sentence of death | मृत्युदंडाचे कैदी | [ sec. 30 M.N. ] |
| prison-offence | कारागृह-अपराध | [ sec. 45 ] |
| prohibited article | प्रतिषिद्ध वस्तू | [ sec. 3(9) ] |
| publication of penalties | शास्ती जाहीर करणे | [ sec. 44 ] |
| punishment book | शिक्षा पुस्तक | [ sec. 51 ] |
| remission system | सूट देण्याची पद्धत | [ sec. 3(*5*) ] |
| report on death of prisoners | कैद्यांच्या मृत्यूबाबत अहवाल | [ sec. 15 ] |
| sentence of transportation | काळ्या पाण्याची शिक्षा | [ sec. 57 ] |
| separate confinement | अलग बंदिवास | [ sec. 46(*8*) ] |
| separation of prisoners | कैद्यांना अलग अलग ठेवणे | [ sec. 27 ] |
| sick prisoners | आजारी कैदी | [ sec. 37 ] |
| solitary confinement | एकांत बंदिवास | [ sec. 29 ] |
| special places of confinement | खास बंदिशाळा | [ sec. 59(*26*) ] |
| subsidiary jail | दुय्यम तुरुंग | [ sec. 3(*c*) ] |
| temporary accommodation for prisoners | कैद्यांसाठी तात्पुरती सोय | [ sec. 7 ] |
| unconvicted criminal prisoners | दोषसिद्ध न झालेले फौजदारी कैदी | [ sec. 33] |
| whipping | फटके मारणे | [ sec. 53 ] |

# कारागृहे अधिनियम, १८९४
# The Prisons Act, 1894

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अलग बंदिवास | separate confinement | [ कलम ४६(८)] |
| आजारी कैदी | sick prisoners | [ कलम ३७] |
| उठाव | out break | [ कलम ५९(६)] |
| (कैद्यांना) एकत्र ठेवणे आणि अलग अलग ठेवणे | association and segregation (of prisoners) | [ कलम २८ ] |
| एकांत बंदिवास | solitary confinement | [ कलम २९] |
| औपचारिक ताकीद | a formal warning | [ कलम ४६(१)] |
| कारागृह | Prison | [ कलम ३(१)] |
| कारागृह-अपराध | prison-offences | [ कलम ४५] |
| कारागृहांची देखभाल | maintenance of prisons | [ प्रकरण-दोन] |
| कारागृहांचे अधिकारी | officers of prisons | [ कलम ६ ] |
| काळ्या पाण्याची शिक्षा | sentence of transportation | [ कलम ५७] |
| कैद्यांची सोय | accomodation for prisoners | [ कलम ४] |
| कैद्यांच्या मृत्यूबाबत अहवाल | report on death of Prisoners | [ कलम १५] |
| कैद्यांना अलग अलग ठेवणे | separation of prisoners | [ कलम २७] |
| कैद्यांना दाखल करून घेणे, हलवणे व मुक्त करणे | admission, removal and discharge of prisoners | [ प्रकरण चार] |
| कैद्यांसाठी तात्पुरती सोय | temporary accomodation for prisoners | [ कलम ७] |
| कोठडी बंदिवास | cellular confinement | [ कलम ४६(१०)] |
| खास बंदिशाळा | special places of confinement | [ कलम ५९(२६)] |
| तुरुंग | jail | [ कलम ५] |
| तुरूंगाधिकारी | jailor | [ कलम १६] |
| दाखल केल्यानंतर कैद्यांची तपासणी करणे | prisoners to be examined on admission | [ कलम २४] |
| दिवाणी कैद्यांचे सेवायोजन | employment of civil prisoners | [ कलम ३४ स.टी.] |
| दुय्यम तुरुंग | Subsidiary jail | [ कलम ३ (ग)] |
| दुय्यम वैद्यकीय कर्मचारी | medical subordinate | [ कलम ३(८)] |
| दोषसिद्ध झालेला अधिकारी | convict Officer | [ कलम २३] |
| दोषसिद्ध न झालेले फौजदारी कैदी | unconvicted criminal prisoners | [ कलम ३३] |
| नियमांच्या प्रती प्रदर्शित करणे | Exhibition of copies of rules | [ कलम ६१] |
| पळून जाण्याचा प्रयत्न | attempt to escape | [ कलम ५९(६)] |
| प्रतिषिद्ध वस्तू | prohibited article | [ कलम ३(९)] |
| फटके मारणे | whipping | [ कलम ५३] |
| फौजदारी कैदी | criminal prisoner | [ कलम ३(२)] |
| फौजदारी कैद्यांचे सेवायोजन | employment of criminal prisoners | [ कलम ३५] |
| फौजदारी बलप्रयोग | criminal force | [ कलम ४५(२)] |
| बेड्या घालून बंदिस्त करणे | confinement in iron | [ कलम ५६] |
| महानिरीक्षक | Inspector General | [ कलम ५] |
| मृत्युदंडाचे कैदी | prisoners under sentence of death | [ कलम ३० स.टी.] |
| विविक्षित कैद्यांचा खाजगीरीत्या निर्वाह | maintenance of certain prisoners from private sources | [ कलम ३१] |
| वृत्तक | history-ticket | [ कलम ३(६)] |
| शास्ती जाहीर करणे | publication of penalties | [ कलम ४४] |
| शिक्षा आहार | Penal diet | [ कलम ४६(९)] |
| शिक्षा पुस्तक | punishment book | [ कलम ५१] |
| शिक्षेचे बहुत्व | Plurality of punishment | [ कलम ४७स.टी.] |
| सहज दृष्यजागी | in conspicuous place | [ कलम ४४] |
| सूट देण्याची पद्धत | remission system | [ कलम ३(५)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग,
  **मुंबई ४०० ००४.**
  दूरध्वनी : ०२२–२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  **पुणे ४११ ००१.**
  दूरध्वनी : ०२०–२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाइन्स,
  **नागपूर ४४० ००१.**
  दूरध्वनी : ०७१२–२५६२ ६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  **औरंगाबाद ४३१ ००१.**
  दूरध्वनी : ०२४०–२३३१ ४६८, २३३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  **कोल्हापूर ४१६ ००३.**
  दूरध्वनी : ०२३१–२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**